**"चांदा ते बांदा"योजनेंतर्गत सन २०१९-२० मागणी क्र.ओ-७, लेखाशिर्ष "३४५१-सचिवालय आर्थिक सेवा, ०९०-सचिवालय, (०५) चांदा ते बांदा विशेष कार्यक्रम, (०५)(०२) चांदा ते बांदा योजनेंतर्गत विकास योजना (कार्यक्रम)" (३४५१A०२८) निधी पुनर्वितरण करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## नियोजन विभाग

**शासन निर्णय क्रमांक:- चांबांयो-२०१९/प्र.क्र.८३/का.१४१८**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०७ ऑगस्ट, २०१९

वाचा:-

१. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डिएपी-१०१५/प्र.क्र.५१/का.१४८१, दि.२९.०६.२०१६.
२. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डिएपी-१०१५/प्र.क्र.५१/का.१४८१, दि.७.०७.२०१७.
३. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. चांबांयो-२०१९/प्र.क्र.८३/का.१४१८, दि.२०.०६.२०१९ व दि.३०.०७.२०१९.
४. जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांचे पत्र क्र.जिप्रव्यक/का-१५/कास-१/चांबांयो/२०१९/२५,दि.१४.०५.२०१९.

**शासन निर्णय:-**

नियोजन विभागाचे संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये चंद्रपुर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होण्यासाठी सधन नियोजन व अंमलबजावणीचा विशेष कार्यक्रम राबविण्याच्या अनुषंगाने चंद्रपूर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये "चांदा ते बांदा" ही योजना राबविण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. नियोजन विभागाचे संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये "चांदा ते बांदा" ही योजना राबविण्यासाठी योजनेच्या सुधारीत कार्यपध्दतीस मान्यता देण्यात आलेली आहे.

२. जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांनी संदर्भाधीन क्र.४ येथील पत्रानुसार चांदा ते बांदा कार्यक्रमा-करीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी मागणी क्र.ओ-७, लेखाशिर्ष ३४५१A०२८ अंतर्गत उद्दीष्ट "२१, पुरवठा व सामुग्री" अंतर्गत रु.३६०.४६ लक्ष निधीची मागणी केलेली आहे. सदर मागणी विचारात घेऊन सन २०१९-२० साठी मागणी क्र.ओ-७, लेखाशिर्ष "३४५१-सचिवालय आर्थिक सेवा, ०९०, (०५) चांदा ते बांदा विशेष कार्यक्रम, (०५)(०२) चांदा ते बांदा योजनेंतर्गत विकास योजना (कार्यक्रम) (३४५१A०२८)" याखाली "३३-अर्थसहाय्य" या उद्दीष्टाखाली अर्थसंकल्पिय तरतूद रु.८२५.५१ लक्ष पैकी "२१, पुरवठा व सामुग्री" या उद्दीष्टाखाली रु.२७७.७०२ लक्ष (रु.दोन कोटी सत्याहत्तर लक्ष सत्तर हजार दोनशे फक्त) इतका निधी पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे पुनर्वितरीत करण्यात येत आहे.

**(रु.लाखात)**

| लेखाशिर्ष | उद्दीष्ट | मंजुर अनुदान | पुनर्वितरणद्वारे निधीत केलेली घट/वाढ रक्कम | | पुनर्वितरणानंतर एकुण मंजुर अनुदान (३-४+५) |
|---|---|---|---|---|---|
| | | | घट (-) | वाढ (+) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| मागणी क्र.ओ-०७, लेखाशिर्ष "३४५१-सचिवालय आर्थिक सेवा, ०९०-सचिवालय, (०५) चांदा ते बांदा विशेष कार्यक्रम, (०५) (०२) चांदा ते बांदा योजनेंतर्गत विकास योजना (कार्यक्रम) (३४५१A०२८)" | ३३-अर्थसहाय्य | ८२५.५१० | २७७.७०२ | ०.०० | ५४७.८०८ |
| | २१-पुरवठा व सामग्री | १३७.९३० | ०.०० | २७७.७०२ | ४१५.६३२ |
| | **एकुण** | **९६३.४४०** | **२७७.७०२** | **२७७.७०२** | **९६३.४४०** |

३. वित्तीय अधिकार नियमपुस्तिका-१९७८, भाग पहिला, उपविभाग-तीन मधील अनुक्रमांक-३, परिच्छेद क्र.१६६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. नियोजन विभागाचा हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०८०७१६५३३६१७१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vanita Narayan Jadhav

Digitally signed by Vanita Narayan Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f0e1884948542877a779b797fc357f1c34d84fe1aa3f9bdc30c060e0431223f, serialNumber=ad56893b2ddc6497ed23d778715c30a6ea094f5d1e0fb38a44ac5b9179a65d83, cn=Vanita Narayan Jadhav
Date: 2019.08.07 17:02:05 +05'30'

**( वनिता ना. जाधव )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत:-**

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपुर.
२. जिल्हाधिकारी, चंद्रपुर / सिंधुदुर्ग.
३. उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपुर / नवी मुंबई.
४. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, चंद्रपुर / सिंधुदुर्ग.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, चंद्रपुर / सिंधुदुर्ग.
६. जिल्हा समन्वयक, जिल्हा समन्वय कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपुर/ सिंधुदुर्ग.
७. वित्त विभाग (अर्थ-१६), मंत्रालय, मुंबई.
८. कार्यासन अधिकारी (का.१४२४), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रकल्प संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती.